
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# १९ व्या शतकातील सामाजिक शास्त्रातील नवदृष्टीकोन- 'एक ऐतिहासिक अवलोकन'



**प्रा.डॉ.रसाळ दशरथ किसन**
(इतिहास विभाग प्रमुख)
रयत शिक्षण संस्थेचे,
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय,सोलापूर.

**प्रस्तावना-**

१९ व्या शतकात ख-या अर्थाने सामाजिक दृष्टीने लिखाणाला सुरुवात झाली. ऐतिहासिक संशोधनातील नवदृष्टीकोन पाहिल्यास अनेक नवप्रवाह पुढे आलेले दिसुनयेतात. जसे की, वंचितांचा इतिहास,साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा प्रवाह.मार्क्सवादी प्रवाह, स्थानिक इतिहास प्रवाह.नववसाहतवादी प्रवाह,इ.असे अनेक प्रवाह १९ व्या शतकात उदयास आले. महाराष्ट्रात तर महात्मा ज्योतिबा फुले यांनी पहिल्यांदा वंचिताच्या लिखाणाला सुरुवात केल्याचे दिसून येते. १९ व्या शतकात जे ऐतिहासिक संशोधानाच्या क्षेत्रात जे नवे प्रवाह समोर आले. त्यामध्ये वंचिताचा इतिहास,स्थानिक इतिहास वसाहतवादी इतिहासलेखन, मार्क्सवादी इतिहासाचा प्रवाह,व असे अनेक सामाजिक शास्त्रातील नवप्रवाह पुढे आलेले दिसुन येतात. त्यामध्ये सामाजिक शास्त्रातील नव प्रवाहामुळे समाजाचे कार्य कर्तृत्व पुढे आलेले आहे.त्यामुळे त्यांचे कार्य सर्वाना माहित झालेले दिसून येते.कारण भारतात्तील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत म्हणून ज्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे.अशा अनेक समाजसुधारकानी व महामानवानी आपापल्या कालखंडात सामाजीक परिवर्तनाची लढाई जिंकून वंचिताच्या कार्याला इतिहासत स्थान दिलेले आहे. त्यामुळेच आज महाराष्ट्रात्त त्यांच्या कार्याची ओळख नव्याने करून देण्याची गरज आहे. त्यामुळेच वंचिताचा इतिहास आज कुठेतरी इतिहासाच्या पानापानांत दिसत आहे. त्याचे श्रेय हे या महामानवाकडे जाते.त्यांनी वंचित,उपेक्षित समाजात झालेल्या व्यक्तीला इतिहासात स्थान देऊन त्यांच्या कार्याची ओळख करून दिली.त्यांनी सामाजिक परिवर्तन करीत असताना जात-धर्म लक्षात न घेता त्यांचे कार्य लक्षात घेऊन त्यांच्या कार्याची इतिहास लेखनात दखल घेतली. म्हणूनच १९ व्या शतकातील सामाजिक शास्त्रातील नवप्रवाहामुळे समाजाच्या अभ्यासाची सोय झालेली दिसून येते.सामाजिक व सांकृतिकदृष्ट्या नवदृष्टीकोन निर्माण करून सामाजिक शास्त्रात अनेक नवनवीन प्रवाह समोर आले आहेत.त्यामध्ये अनेक प्रवाहाचा सामावेश होतो. या सामाजिक प्रवाहामुळे त्यांच्या कार्याला इतिहासात स्थान देऊन त्यापासून प्रेरणा घ्यावी हीच भावी पिढीकडून अपेक्षा आहे.

**गोषवारा-**

ऐतिहासिक संशोधनातील नवदृष्टीकोन लक्ष्यात घेता सामाजिक शास्त्रातील नवीन प्रवाह विचारात घेऊन समाजातील विविध घटकांचा इतिहासाच्या दृष्टीने अभ्यास करता येईल त्याकरीता संशोधकांचा दृष्टीकोन बदलने ही काळाची गरज आहे.कारण ऐतिहासिक संशोधन करीत असताना समाजातील विविध घटकांच्या कार्याचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे.त्या अभ्यासामुळे आपणास अनेक नवीन पैलूचे दर्शन होते. व इतिहासाची कक्षा रुंदावली जाते. त्यामुळेच ऐतिहासिक संशोधनाची मर्यादा वाढलेली आपणास दिसून येते.त्यासाठी नवीन येणा-या संशोधकांनी आपली ज्ञानाची कक्षा वाढऊन समर्पक दृष्टीकोन तयार करून त्याचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे आहे.त्यासाठी आपला विशाल दृष्टीकोन ठेवणे गरजेचे आहे. ऐतिहासिक दृष्टीने संशोधन केल्यास आपणास त्या - त्या काळातील झालेल्या सर्व घटना विचारात घ्याव्या लागतील त्याशिवाय आपणास सर्व समाजातील घटकांना न्याय देता येणार नाही. म्हणूनच सामाजिक शास्त्रातील नव प्रवाह विचारात घेऊन सर्व समाज घटकांना सोबत घेऊन त्यांच्या कार्यांचा आढावा घेऊन त्याला इतिहासात घेतल्याशिवाय परिपूर्ण इतिहास लेखन करता येणार नाही. तेव्हा नवसंशोधकाकडून फार मोठी अपेक्षा आहे.त्यांनी ती पूर्ण करावी.व सर्व समाज घटकांना या प्रवाहात घेऊन वाटचाल करावी व एक सत्य इतिहासलेखन करावे हीच आजच्या संशोधकाकडून अपेक्षा आहे.

ऐतिहासिक संशोधनातील नवदृष्टीकोन-ऐतिहासिक संशोधनातील नवदृष्टीकोन पाहता आपणास अनेक नवनवीन प्रवाह समोर येत असल्याचे दिसून येते. जसे की, इतिहासाचे लेखन करीत असताना आपणास सामाजिक शास्त्रातील वेगवेगळे प्रवाह पुढे आल्याचे दिसून येते. ते म्हणजे सामाजिक शास्त्रातील नवप्रवाह पाहत असताना सामाजिक विज्ञान ही विज्ञानाची एक शाखा आहे. जी समाजाच्या अभ्यासासाठी व त्या समाजातील सद्स्यामधील नातेसबंधाला समर्पित आहे१ समाजशास्त्रामध्ये काही नवीन ट्रेंड्स सध्या खालील प्रमाणे आलेले दिसून येतात.ऐतिहासिक संशोधनातील नवदृष्टीकोन पाहता सामाजिक शास्त्रात अनेक नवीन प्रवाह येत आहेत. त्यामध्ये अनेक प्रवाहाचा अंतर्भाव होतो.१) डिजिटल विभाजनाच्या सामाजिक तांत्रिक पैलूवर भर दिला जात आहे.२) सामाजिक रचना आणि वैयक्तिक एजन्सी यांच्या तील परस्पर संवादामुळे मानवी क्रीयाकलापांच्या सर्व क्षेत्रावर परिणाम होत आहे.३)मानवी वर्तन आणि समाज या संबंधीच्या शास्त्रांना सामाजिक शास्त्र किंवा सामाजिक विज्ञान (social science) असे म्हणतात.४) सामाजिक शास्त्रे ही व्यापक स्वरुपाची संकल्पना आहे.५) अलीकडील अभ्यासाच्या विस्ताराने नवीन पुढे आलेल्या डिजिटल विभाजनाच्या सामाजिक तांत्रिक पैलू जोडले गेले.२ ऐतिहासिक संशोधनातील काही नवीन प्रवाह किवां ट्रेंड्स खालील प्रमाणे सांगितले जातात.३ कारण दिवसेंदिवस इतिहासाची व्याप्ती जसजसी वाढत गेली.तसतसे ऐतिहासिक संशोधनात वाढ होत आहे.त्यामुळे ऐतिहासिक संशोधनातील काही नवीन प्रवाह येत आहेत.उदा. मराठी बखरीचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून पुनर्वाचन पुन:वाचन करणे. व त्या अभ्यासाचे क्षेत्र वाढविणे.तसेच स्थानिक इतिहास व स्थानिक ऐतिहासिक संशोधनाचे प्रवाह आले आहेत.

ऐतिहासिक संशोधनातील नवीन प्रवाह- ऐतिहासिक संशोधन करीत असताना अनेक नव-नवीन प्रवाह उजेडात येत आहेत. ते पुढील प्रमाणे आहेत.१)ऐतिहासिक संशोधनात भूतकाळातील घटनांशी सबंधित पुरावे गोळा करणे.त्याचे मूल्यमापन करणे.पडताळणी करणे आणि तथ्ये आणि निष्कर्ष प्रस्थापित करणे याचा समावेश होतो.२)ऐतिहासिक संशोधनात भूतकाळाची पुनर्बांधणी पद्धतशीर आणि निपक्षपाती पाने केली जाते.३) ऐतिहासिक संशोधनात ऐतिहासिक देताचे विश्लेषण करण्याची सांख्यिकीय पद्धती वापरल्या जातात.४) ऐतिहासिक संशोधनात नमुने आणि ट्रेंड ओळखण्यासाठी लोकसंख्याची शास्त्रीय माहिती आर्थिक निर्देश्यांक किवा इतर परिणामाचा डेटा तपासला जातो.५)ऐतिहासिक संशोधनात भूतकाळातील

घटनाची क्रमबद्धरीत्या आणि सुसंगतरीतीने मांडणी केली जाते.६)ऐतिहासिक संशोधनात विशिष्ट गृहीतके (योग्य असल्यास) मध्ये काय घडले याच्या अभ्यासपूर्ण अहवालापर्यंत पोहोचले जाते.म्हणूनच ऐतिहासिक संशोधनातील नवीन प्रवाह पाहता अनेक दृष्टीने नव-नवीन प्रवाहांचा समावेश होतो.याच बरोबर आधुनिक इतिहास लेखनातील नव प्रवाह स्त्रीवादी लेखन आलेला आहे.४ स्त्रीवाद म्हणजे स्त्रीची सर्व क्षेत्रातील समानता,स्त्री-पुरुष समानता स्त्रीचे वैयक्तिक स्वातंत्र होय.स्त्रीमुक्ती आणि स्त्रीवादी संकल्पना पाश्च्यात्य राष्ट्रातील आहेत.दुर्लक्षित राहिलेल्या प्रवर्गावर भर देऊन इतिहासलेखन करणारा प्रवाह म्हणजे स्त्रीवादी प्रवाह होय.५ या विचार प्रवाहामुळे इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहाला नवे वैचारिक व मूल्यात्मक सामर्थ्य मिळत आहे.६ जसे की, ऐतिहासिक संशोधनाचे प्रकार पाहता वैज्ञानिक मानवता कलात्मक आर्थिक,सामाजिक व्यावसायिक विपणन,व्यावसायिक संशोधन,जीवन तंत्रज्ञान इ.संशोधनाचे प्रकार आहेत.७ या प्रकारचे ऐतिहासिक संशोधन भूतकाळातील घटना लोक किवां संस्कृती यांचा अर्थ लावण्यावर लक्ष केंद्रित करणे विशिष्ट ऐतिहासिक संदर्भात त्यांचे महत्व समजून घेण्यासाठी सांस्कृतिक प्रवाह पाहिले जातात.व त्याच बरोबर इतिहास संशोधनाच्या नवदृष्टीकोंनातून स्थानिक इतिहासाचे महत्व ही वाढत जात आहे.८ स्थानिक इतिहास ही एक महत्वाची शाखा आहे.गेल्या ६०-ते ७० वर्षामध्ये स्थानिक इतिहास ही पाश्चात्य देशात रूढ झालेली सर्वमान्य झालेली संकल्पना आहे.थोडक्यात new history मध्ये शास्त्रीय पद्धती असेल.त्यांच्याजवळ जे पुरावे उपलब्ध होतील त्यांच्या आधारेच ति बोलू शकते.मात्र आता मानवी जीवनातील सर्वच घटना महत्वाच्या आहेत,असे समजले जाऊ लागलेले आहे.त्यामुळे आता विविद्र अंगावर लक्ष केंद्रित केले जाऊ लागले.यातून इतिहासामध्ये विविध प्रकार उदयास येऊ लागले आहेत.८जसे सांस्कृतिक, सामाजिक स्थानिक, स्त्रीवादी, पर्यावरनाचा इतिहास ,समकालीन इतिहास,शहरांचा इतिहास ,वंचिताचा इतिहास इ.प्रवाह आहेत. अशावेळी भाषाशास्त्र,मानवशास्त्र,या शाखामधील संकल्पना पद्धतीची मोडेल्सची मदत इतिहासाला होऊ लागलेली आहे.अशारितीने दररोज इतिहासाची व्याप्ती वाढत जात आहे.हा इतिहासाच्कडे पाहण्याचा नाव दृष्टीकोन महत्वाचा समजला जात आहे.

### संशोधनाचे उद्देश-

१)ऐतिहासिक संशोधनामध्ये १९ व्या शतकात झालेल्या प्रवाहाचा शोध घेणे.

२)ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अभ्यास करणे.

३) ऐतिहासिक संशोधनाच्या आधारे विविध पैलू जगासमोर आणणे.

४)संशोधकाने वस्तुनिष्ठ इतिहासाची मांडणी करून आपले संशोधन करणे.

५)ऐतिहासिक संशोधनातील नवदृष्टीकोन समोर ठेऊन संशोधन करणे.

६) सामाजिक शास्त्रातील सर्व घटकांच्या कार्याचा आढावा घेऊन संशोधन करणे.

७)ऐतिहासिक घटनांचे संशोधन करताना समानता हे तत्व समोर ठेऊन कसलाही दुरागृह न ठेवता वास्तविकपणे त्यांच्या कार्याची इतिहासात नोंद घेणे.

८) जात-भेद धर्म, वंश,प्रदेश न पाहता त्याच्या कर्तुत्वाची नोंद घेऊन त्यातून भावी पिढीने प्रेरणा घ्यावी.हीच नाव संशोधककडून अपेक्षा आहे.

संशोधनाची पद्धत-वरील संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करून ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

## सारांश-

अशाप्रकारे सामाजिक विज्ञानातील नाविन ट्रेंडस खालील प्रमाणे असलेले दिसून येतात.तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सामाजिक बदलामुळे जॉब मार्केट अभूतपूर्व वेगाने विकसित होत आहे. AI सारखे तंत्रज्ञान पारंपारीक कलांना प्रकरण आकार देत असल्याने पदवीधरांसाठी नवीन भूमिका उदयास येतात. मानववंशशास्त्राने शरीर व वंशाविषयी चिंता सोडली. आणि वैज्ञानिक अभ्यासाचे योग्य एकक म्हणून संस्कृतीकडे वळले. समाजशास्त्रामध्ये भौतिक माहितीच्या समतुल्य स्वतंत्र आणि मोजण्यायोग्य वास्तविकता म्हणून 'सामाजिक तथ्य'यावर लक्ष केंद्रित केले.१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात लक्ष्यात आली. आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीस सामाजिक प्रश्न आणि आणि संस्थात्मक आणि प्रशासकीय सुधारणांच्या परीस्थिती बद्दलच्या चौकशीचे हळूहळू आणि समानपणे विद्यापीठ-आधारीत सामाजिक विज्ञान शाखांमध्ये रुपांतर झाले.म्हणूनच सामाजिक विज्ञान हि विज्ञानाची एक शाखा आहे.जी समाजाच्या अभ्यासासाठी आणि त्या समाजातील सदस्यामधील नातेसबंधाला समर्पित आहे.म्हणूनच सामाजिक शास्त्रे हे नाव दृष्टिकोनातून आज महत्वाचे वाटत आहेत.

## संदर्भ-

१) Internet-en.wikipedia.org

2) Internet www.linkedin.com

3) इंटरनेट-www.linkedin.com

४)शिंदे टी.एन-इतिहास संशोधनातील नवदृष्टीकोन लक्ष्मी पब्लिकेशन,सोलापूर २०२० पृ.क्र.१

५) उपरोक्त-पृष्ठ क्र.४९,५०

६) उपरोक्त- पृ.क्र.१६८

७)उपरोक्त- पृ.क्र.२१२

८) कुलकर्णी निरंजन,इतिहासलेखनातील नवे प्रवाह,प्रथमावृत्ती २०१९ प्रकाशक दूर शिक्षण केंद्र.शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर. पृ .क्र.३,४